**७) मजूर कमी लागतात. :-**

दूग्ध व्यवसायामध्ये मजूरांचा फार तुटवडा आहे. आणि त्यांच्या मजूरीतही भरमसाठ वाढ झाली असल्याने पशुपालक सतत चिंतेत असतात. परंतु या पध्दतीत अतिशय कमी प्रमाणात मजूर लागतात हा सर्वात मोठा फायदा आहे.

**८) औषधांवरील खर्च अतिशय कमी :-**

मुक्त गोठा पध्दतीत जनावरे निरोगी राहतात. गोठ्यातील जनावरांना अस्वच्छ वातावरणात दगडी किंवा स्तनदाह होत असतो. गोठ्यातील **३५ ते ४०% जनावरांना दगडी किंवा स्तनदाह हा रोग होत असतो.** मुक्त गोठा पध्दतीत रोगाचे प्रमाण अतिशय कमी असते. त्यामुळे औषधांचा खर्च कमी होतो.

**९) वैरण जास्त प्रमाणात खातात :-**

या पध्दतीत जनावरांचा व्यायाम जास्त होतो. म्हणून ती वैरण जास्त खातात, **दूध ही जास्त मिळते.**

दूग्ध उत्पादनासाठी मुक्त गोठा पध्दत अतिशय चांगली आहे. जनावरे अशा गोठ्यामध्ये तणावमुक्त असतात. दुधाचा व्यवसाय किफायतशीर करता येतो. **दूग्ध व्यवसाय करताना नफ्यात वाढ करता येते,** त्यासाठी नविन गोठे करताना मुक्त गोठा पध्दतीचा सखोल अभ्यास करुन **मुक्त गोठा पध्दतीचा स्विकार करावा.**








मुक्त संचार गोठा




मुक्त संचार गोठा व्यवस्थापन वर मार्गदर्शन करताना तज्ञ मार्गदर्शक डॉ. धांडोरे सी.व्ही.

प्रकाशक
**डॉ. रविंद्र सिंह**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, कोल्हापूर-II
* तांत्रिक माहिती स्त्रोत्र : भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली

# मुक्त संचार गोठा व्यवस्थापन



लेखक व संकलन
**डॉ. धांडोरे सी. व्ही.**
विषय विशेषज्ञ (पशु संवर्धन विभाग)

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली
श्री सिध्दगिरी
**कृषि विज्ञान केंद्र, कोल्हापूर-II**
कणेरी, ता. करवीर, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र) ४१६ २३४.
फोन नं.: ०२३१-२९८०००१
ई-मेल : kvkkolhapur2@gmail.com

### मुक्त संचार गोठा व्यवस्थापन :-

दिवसेंदिवस दूध उत्पादनात वाढ होत आहे. अनेक वर्षापासून देशातील पशुपालक दूध व्यवसाय व्यवसायिक दृष्टीकोन ठेवून दूग्धव्यवसाय करत आहेत. परंतु या व्यवयासायात प्रामुख्याने जनावरांच्या संगोपनात अनेक त्रुटी आढळून येतात. या त्रुटींवर लक्ष केंद्रित केले तर जनावरांपासून जास्त दूध उत्पादन मिळेल. जनावरांच्या व्यवस्थापनेत गोठ्याला फार महत्वाचे स्थान आहे.

आरोग्यदायी गोठा असेल तर जनावरे निश्चित जास्त दूध देतात. परंतु जर गोठ्याची परिस्थिती पाहिली तर बहुसंख्य पशुपालक जनावरे झाडाखाली, घराच्या समोर किंवा घराच्या भिंतीच्या बाजूला बांधलेली आढळतात. जनावरे ज्या ठिकाणी बांधली जातात. ती जागाही अस्वच्छ असते आणि चढउताराची किंवा जमिनीला खाच खळगे असतात. त्यामुळे अशा जागेवर जनावरे बांधली गेली तर त्यांना आराम तर मिळत नाही. परंतु त्या परिस्थितीचा त्यांना त्रासच होत असतो.

यामध्ये पशुपालकांचे फार मोठे नुकसान होते. कारण अशा जनावरांपासून अपेक्षेप्रमाणे दूध उत्पादन मिळत नाही. अनेक प्रगतशील पशुपालकांच्या लक्षात आले आहे की, दुभत्या जनावरांचा गोठा स्वच्छ आणि आधुनिक पध्दतीचा असावयास पाहिजे. त्यांनी आधुनिक पध्दतीचे गोठेही बांधले आहेत. परंतु असे गोठे बांधण्यासाठी खर्च मोठ्या प्रमाणात करावा लागतो. दुधाचे अर्थशास्त्र असे आहे की या व्यवसायात कष्ट फार आहेत. या व्यवसायात गुंतविलेले भांडवल लवकर वसुल करता येत नाही. दुध व्यवसाय परवडत नाही, अशी सतत पशुपालक चर्चा करीत असतात. हा व्यवसाय परवडत नाही अशी जरी चर्चा करत असतील तर हा एकमेव असा व्यवसाय जो शेतकरी शेती संभाळून करु शकतो.

दुसरे म्हणजे दुधाचा पैसा नियमित पशुपालकांना मिळत असतो. महिन्यातून दोन तीन वेळा दुधाचे पैसे मिळत असल्याने शेतकऱ्यांना कोणत्याही सावकाराकडे हात पसरण्याची वेळ येत नाही. गोठा बांधण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. हा खर्च टाळण्यासाठी मुक्त गोठा संगोपन पध्दतीची संकल्पना पुढे आलेली आहे. या पध्दतीच्या गोठ्यामुळे कमीत कमी खर्चात दुधाचे उत्पादन मिळते. जनावरांना नैसर्गिक परिस्थिती फार आवडते. ही परिस्थिती मुक्त गोठ्यामध्ये तयार करता येते. जनावरांना मोकळे राहणे आवडते. त्यांना झाडाखाली बसणे आवडते. ज्यावेळी भूक लागेल त्यावेळी चारा खाणे आवडते. तहान लागेल त्यावेळी पाणी पिणे आवडते. या पध्दतीत जागा थोडी जास्त लागते. परंतु गोठ्यामुळे फायदे अनेक होत असतात. ज्याठिकाणी मुक्त गोठे पध्दत आहे ती जमिन सपाट असावी. जवळपास सावली देणारी झाडे असल्यास फारच चांगले.

१ गुंठा क्षेत्रात ५ जनावरे एवढी जागा लागते. त्यानुसार आपणांस जेवढ्या जनावरांचा गोठा करावयाचा आहे. तेवढी मोकळी जागा आपणांकडे असणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या जागेत जमिनीपासून १.२ मीटर बांबूचा किंवा लाकडांचा कठडा तयार करावा. हा कठडा फक्त ३ बाजूला करावा. ज्या ठिकाणी गव्हाण आहे आणि पाण्याची सोय केलेली आहे त्याबाजूला कठडा करु नये. ज्या ठिकाणी गव्हाण आणि पाणी पिण्याची सोय आहे त्या ठिकाणी छतावर सिमेंटचे पत्रे किंवा तुराट्याचे छत तयार करावेत. जनावरे व्यवस्थित उभी राहतील एवढी छताखाली जागा असणे आवश्यक आहे.

बहुतेक वेळा जनावरे मोकळ्या जागेतच असतात. ज्यावेळी त्यांना चारा, पशुखाद्य खायचे असेल किंवा पाणी प्यायचे असेल त्यावेळेसच जनावरे छताखाली किंवा गोठ्यासारखे तयार केलेल्या जागेत येतात. अशा प्रकारच्या गोठ्यांपासून फारच फायदे होतात, आणि दुधाचा व्यवसाय फायदेशीररित्या करता येतो. अशा गोठ्यापासून नेमके कोणते फायदे आहेत ते आपण पाहुया :

#### १) गोठा बांधण्याचा खर्च कमी येतो :-

आधुनिक पध्दतीचा गोठा बांधण्यास खर्च जास्त येतो. परंतु मुक्त गोठ्यामध्ये खर्च नगन्य येतो. यामध्ये बांबू किंवा लाकडाचा वापर केला जातो.

#### २) जनावरांना पाहिजे त्या वेळेत पाणी पिता येते. :-

जनावरास १ लिटर दूध तयार करावयास ४ लिटर पाणी लागते. जनावरे मोकळी असल्याने त्यांना हवे तेवढे पाणी पिता येते. त्यामुळे दुधाच्या उत्पादनात वाढ दिसून येते.

#### ३) दूध उत्पादनात वाढ :-

अशा पध्दतीच्या गोठ्यामध्ये जनावरांच्या १५ ते २०% दूध उत्पादनात वाढ होते.

#### ४) जनावरे मोकळी असल्याने त्यांना समाधान लाभते :-

जनावरे सतत मोकळी असल्याने ती फिरतात, बसतात त्यांना जसे वागावे तसे ते वागतात. त्यामुळे जनावरांमध्ये आनंदी हार्मोन्स तयार होतात. त्यामुळे शरीराला आराम मिळतो. जनावरांचा ताण तणाव कमी होतो.

#### ५) जनावरांना सतत धुण्याची गरज नाही :-

आधुनिक पध्दतीच्या गोठ्यात असणारी जनावरे सतत धुवावी लागतात. ती शेण आणि मुत्राने माखली असतात. उन्हाळ्यामध्ये त्यांना गरम होते म्हणून पशुपालक त्यांना २ वेळा धुतात. परंतु मुक्त गोठ्यात झाडाची सावली असते, गरम होत नाही. ती शेणाने किंवा मुत्राने माखली जात नाहीत. त्यामुळे त्यांना सवडीने धुतले तरी चालते. त्यामुळे त्यांना धुण्यासाठी लागणारे पाणी आणि पशुपालकाची मेहनत वाचते.

#### ६) जनावर माजावर आलेले लवकर समजते :-

माजावर आलेली जनावरे एकमेकांवर उडतात. त्यामुळे माजावर आलेली जनावरे लवकर ओळखली जातात. आणि त्यांना वेळेत वळू दाखविला जातो किंवा कुत्रिक रेतन करता येते. वेळेत गाभण राहून पैदाशीचे चक्र नियमीत राहून दूध उत्पादनात सातत्य राहते.